# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **11 दिवसाच्या बापाच्या विसर्जनासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व सोयीसुविधांनी सज्ज.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रात गणेशोत्सव 2024 नियोजनपूर्ण साजरा करण्यात येत आहे. त्याचबरोबर पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्याकरीता मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार शहरात 04 कृत्रिम तलाव निर्मिती व 22 नैसर्गिक तलावांची निवड करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर शहरातील विसर्जन ठिकाणी रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक, आवश्यक प्राथमिक औषधोपचार,आवश्यक त्या ठिकाणी जेसीबी आणि क्रेनची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच लाईफ जॅकेट, एमरजन्सी लाईट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व विसर्जन ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देखरेख ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे विसर्जन मार्गावरील फेरीवाल्याना हटविण्यात आले आहे. विसर्जना ठिकाणी सुरक्षेतेसाठी पोलिस बंदोबस्तासह सुरक्षा रक्षक, मिरा भाईंदर महानगर पालिकेचे अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच मिरा भाईंदर महानगर पालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आले आहे. तरी मिरा भाईंदर शहरातील नागरीकांनी व समस्त गणेश मंडळांनी बापाचे विसर्जन करताना विशेष काळजी घेऊन शांततेत, पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही आणि प्रदुषण मुक्त विसर्जन होण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्तांनी केले आहे.